(४१५)

क्र•बीएमआरडीए/एमटीजी/३९

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
५वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे [पूर्व], मुंबई - ४०० ०५१•

दिनांक : २६ फेब्रुवारी, १९८६

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २ जानेवारी, १९८६ रोजी झालेल्या एकोणचाळीसाव्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे•

सन्माननीय सदस्यानी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती•

श्री वि आसगांवकर
[श्र•वि•आसगांवकर]
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,

सर्व सदस्य,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सर्व अधिकारी

---------

No.BMRDA/MTG/39.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan, 5th Floor,
Bandra(East), Bombay-400 051.

Date : 26th February, 1986.

The minutes of the 39th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 2nd January, 1986 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

S.V.Asgaonkar
26/2/86
(S. V. ASGAONKAR)
SECRETARY
EXECUTIVE COMMITTEE.

To:

All Members.

The Officers of the B.M.R.D.A.

-.-.-.-.-.-.-

ukd:

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
३९व्या बैठकीचे कार्यवृत्त

---

दिनांक : २ जानेवारी, १९८६[गुरुवार]

वेळ : दुपारी २-०० वाजता

सभास्थान : मा.मुख्यमंत्री यांचा समिती-कक्ष.
[सहावा मजला], मंत्रालय

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| श्री.शिवाजीराव पाटील-निलंगेकर,<br>मुख्यमंत्री व नगर विकास मंत्री | -- | अध्यक्ष |
| डॉ.व्ही.सुब्रह्मण्यन्,<br>गृहनिर्माण मंत्री | -- | सदस्य |
| डॉ.राममनोहर त्रिपाठी,<br>नगर विकास राज्यमंत्री | -- | सदस्य |
| श्री.छगन भुजबळ,<br>मुंबईचे महापौर | -- | सदस्य |
| श्री.अमरनाथ वामन पाटील,<br>अध्यक्ष, स्थायी समिती, मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्री.रमणलाल-छोटालाल अंकलेश्वरीया,<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्रीमती इंदुमती त्रि.पटेल,<br>नगरसेविका, मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्री.भगवंतराव अण्णासाहेब पाटील,<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्री.रमेश दुबे,<br>विधानसभा सदस्य | -- | सदस्य |
| श्री.चंद्रशेखर प्रभू,<br>विधानसभा सदस्य | -- | सदस्य |
| श्री.पांडुरंग शिवराम देशमुख,<br>विधान परिषद सदस्य | -- | सदस्य |
| श्री.भालचंद्र गो.देशमुख,<br>महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव | -- | सदस्य |
| श्री.दिनेशकुमार जैन,<br>शासनाचे सचिव, नगर विकास विभाग | -- | सदस्य |
| श्री.दिनेश अफ्झलपूरकर,<br>शासनाचे सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | -- | सदस्य |
| श्री.एस.आर.काकोडकर,<br>महानगर आयुक्त | -- | सदस्य सचिव |

...२/-

बाब क्र.१ : मागील [३७व्या] बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे

उपरोक्त बाबीवर आपले विचार व्यक्त करताना मा.अध्यक्षानी सांगितले की, प्राधिकरणाने आपल्या ३६व्या बैठकीत प्रसारण पध्दतीने जे निर्णय घेतले, त्या निर्णयाचे अनुसमर्थन करणे या विशिष्ट प्रयोजनाकरिता दिनांक ८ एप्रिल, १९८५ रोजी प्राधिकरणाची ३७ वी बैठक पार पाडली व त्या [३७व्या] बैठकीचे कार्यवृत्त कायम करण्याकरिता सादर करण्यात आले आहे. तथापि ६ बाबींवर म्हणजे ठराव क्र.२७६, २७७, २८२, २८४, २८५ आणि २८६ अन्वये घेतलेल्या निर्णयामध्ये ३७व्या बैठकीत मुलभूत फेरफार करण्यात आले. प्रसारण पध्दतीने घेतलेल्या निर्णयावर, त्याच्या अनुसमर्थनार्थ आयोजित बैठकीत मूलत: फेरफार करता येत नाही, अशी या बाबतची कायदेशीर बाजू असल्याचे स्पष्टीकरण मा.अध्यक्षांनी या प्रसंगी केले.

या संदर्भात असे स्पष्ट करण्यात आले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम १३ खाली अधिसूचना प्रख्यापित करतेवेळी ठराव क्र.२७६ व २७७ मध्ये करण्यात आलेल्या फेरफारांची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

ठराव क्र.२८२ च्या संदर्भात असे सांगण्यात आले की, जरी प्राधिकरणाने अभियांत्रिकी विभागासाठी अतिरिक्त पदे निर्माण करण्यास मंजूरी दिली असली तरी त्यापैकी कोणतेही पद भरण्यात आलेले नाही व १९८५-८६ वर्षाच्या उर्वरित काळात फक्त आवश्यकतेनुरूप व कमीत कमी पदे भरली जातील.

"वित्त सल्लागार" व "मुख्य लेखा अधिकारी" या पदांचे विलीनीकरण करण्यास शासनाची संमती मिळत नाही. ही दोन पदे स्वतंत्र असावीत आणि मुख्य लेखा अधिकाऱ्याच्या पदासाठी रू.१५००-२२५० ही जुनी वेतनश्रेणी पुनरुज्जीवीत करण्यात यावी असा शासनाचा दृष्टीकोन असल्याचे ठराव क्र.२८४ च्या संदर्भात सांगण्यात आले. प्राधिकरणाने शासनाच्या दृष्टीकोनाशी सहमत व्यक्त केले.

पवई क्षेत्र विकास योजनेच्या संदर्भात यापूर्वीच घेतलेल्या निर्णयात काही जादा अटी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. तथापि, या क्षेत्र योजनेबाबतीत निष्पादीत केला जाणाऱ्या त्रि-पक्षीय करारनाम्याचे प्रारूप अद्याप राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या विचाराधीन आहे अशी माहिती ठराव क्र.२८५ च्या संदर्भात देण्यात आली.

...३/-

ठराव क्र•२८६ मध्ये करण्यात आलेल्या फेरफारान्वये कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन यानी विक्रीचा देकार स्वीकारला नाही तर संदर्भाधीन भू-खंडांचे भारतीय आयु:र्विमा महामंडळाला प्रति चटई क्षेत्र निर्देशांक चौ•मीटरला रु•३२००/- या अधिमूल्य दराने नियत वाटप करण्याच्या प्रस्तावाला पर्यायी मंजूरी लाभली असल्याचे सदर ठरावासंदर्भात सांगण्यात आले आहे•

नंतर बैठकीचे कार्यवृत्त पक्के करण्यांत आले•

बाब क्र•२ : मागील [३७व्या] बैठकीच्या कार्यवृत्तावर केलेली कार्यवाही

कार्यवाही-अहवालाची प्राधिकरणाने नोंद घेतली•

बाब क्र•३ : अशासकीय सदस्याना प्राधिकरणाच्या बैठक-उपस्थितीसाठी बैठक-शुल्क

प्राधिकरणाने बाब-टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या संदर्भात पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र•२९० :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ५० सोबत उक्त अधिनियमाच्या कलम ४ चे उप-कलम [५] खालील प्रयोज्य शक्तींचा आणि त्या संदर्भात त्याला सक्षम बनविणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करुन हे प्राधिकरण, बाब टिप्पणीच्या जोडपत्रात प्रस्तावित केल्याप्रमाणे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [सदस्यांचे भत्ते] [दुरुस्ती] विनियम, १९८५, त्याना राज्य शासनाची मान्यता मिळेल या गृहीतकाच्या अधीन राहून याद्वारे तयार करीत आहे•

" त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, प्रस्तुत प्रकरणी राज्य शासनाला विनंती करण्याकरिता महानगर आयुक्ताना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे•"

बाब क्र•४ : वांद्रे-कुर्ला समूहाच्या "इ" ब्लॉकमधील भू-खंड क्र•सी-१८ व सी-१९ चे भारतीय आयु:र्विमा महामंडळाला नियत वाटप : अधिमूल्यात सुधारणा

या बाबीवर झालेल्या चर्चेत भू-खंडाच्या अधिमूल्यात प्रती चटई

•••४/-

क्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला रु.३२००/- वरून प्रति चटई क्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला रु.४५५०/- अशी सुधारणा करण्यास व मान्यता दर्शविण्यात आली. तसेच प्रस्तुत भू-खंडावरील एक-दशांश परिवध्द क्षेत्राचे राज्य शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग ठरवील त्या भाडयाने पट्टेदाराकडून राज्य शासनास भाडे-तत्वावर नियत वाटप केले जाईल अशी जादा अट घालण्याची सूचनाही करण्यात आली. प्राधिकरणाने त्या अटीसापेक्ष पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२९१ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण आपल्या निहीत शक्तींचा वापर करून, वांद्रे-कुर्ला समूहाच्या "इ" ब्लॉकमध्ये भारतीय आयु:र्विमा महामंडळाला नियत वाटपाने द्यावयाच्या क्र.सी-१८ व सी-१९ या दोन वाणिज्य भू-खंडाबाबतीत प्रस्तुत भू-खंडावरील एक-दशांश परिवध्द क्षेत्राचे राज्य शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग ठरवील त्या भाडयाने पट्टेदाराकडून राज्य शासनास भाडेतत्वावर नियत वाटप केले जाईल या जादा शर्तींच्या सापेक्ष-प्रति चटई क्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला रु.३२००/- या अधिमूल्य दरात, प्रती चटई क्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला रु.४५५०/- अशी सुधारणा करण्यास याद्वारे मान्यता देत आहे."

बाब क्र.५ : वांद्रे-कुर्ला समूहाच्या "एच" ब्लॉकमधील भू-खंडाचे तेल व नैसर्गिक वायू आयोगाला नियत वाटप

या बाबीवर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

बाब क्र.६ : ठाणे तालुक्यांतील पाचपाखाडी येथे जमिनीचे नियत वाटप- मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्थेची [संकल्पित] विनंती.

संचालक, नगर रचना यांनी संदर्भाधीन जमिनीचे १ फेब्रुवारी, १९८४ रोजी स्थिती असल्याप्रमाणे चौ.मीटरला रु.२५०/- इतके मूल्य निर्धारित केले होते. ते कमी वाटते असे मत उपरोक्त बाबीवरील चर्चेतव्यक्त करण्यात आले. त्यामुळे संचालक, नगर रचना यांजकडून जमिनीचे पुनर्मूल्यन करवून घेण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला.

बाब क्र.७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २५ खाली उप-कराची आकारणी

उपरोक्त बाबीवर अल्पशी चर्चा होऊन सदर बाब विचारात घेण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

...५/-

बाब क्र.८ : ओशिवरे जिल्हा केंद्राच्या प्रस्तावास अनुलक्षून सूचना व हरकतींची सुनावणी करण्यासाठी नियोजन समितीची नियुक्ती

प्राधिकरणाने सदर बाबीवर विचारविमर्श केला व त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२९२ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २९ चे उपकलम २ अन्वये प्रदत्त शक्तींचा व त्या संदर्भात त्याला सक्षम बनविणा-या इतर सर्व शक्तींचा अवलंब करून हे महानगर प्राधिकरण ओशिवरे जिल्हा केंद्राच्या प्रारुप प्रस्तावांना अनुलक्षून प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचना नियोजन समितीकडे अग्रेषित करण्यास आपली मान्यता देत आहे व प्रचलित कायद्यानुसार त्यांची समितीने हाताळणी करण्याचा याद्वारे आदेश देत आहे. या समितीवर पुढील सदस्य रहातील :

[१] श्रीमती इंदुमती त्रि.पटेल,

[२] आयुक्त, मुंबई महानगरपालिका; आणि

[३] महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण"

बाब क्र.९ : वडाळा येथील ट्रक टर्मिनलमधील परिवध्द जागांची विक्री

या बाबीवर विचारविमर्श झाल्यानंतर त्या अनुलक्षाने प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२९३ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ९ चे उप-कलम [१] सोबत अधिनियमाचे कलम ५०--या खालील प्रयोज्य शक्तींचा आणि त्या संदर्भात त्याला सहाय्यभूत होणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करून हे प्राधिकरण बाब टिप्पणीच्या जोडपत्र-अ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ट्रक टर्मिनल स्थावर संपत्ती समिती [घटना, शक्ती व कार्ये] विनियम, १९८६ हे विनियम त्यामध्ये पुढील फेरफार घडविण्याच्या सापेक्ष तयार करण्यास याद्वारे आपली मान्यता देत आहे :-

[१] प्रारुप नियम क्र.४ मध्ये महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश

...६/-

विकास प्राधिकरण हे समितीचे अध्यक्ष आणि आयुक्त, मुंबई महानगरपालिका व परिवहन आयुक्त, मुंबई हे समितीचे सदस्य रहातील अशा पध्दतीने फेरफार करण्यात यावा.

[२] समितीच्या दोन सदस्यांची उपस्थिती ही गणपूर्ती मानली जावी अशा पध्दतीने प्रारुप नियम क्र.७ मध्ये फेरफार करण्यात यावा.

[३] प्रस्तावित विनियमांमध्ये क्र.१२ या नवीन नियमाची भर घालण्यात यावी:

'१२. कोणत्याही बाबीवर किंवा बाबींवर सहाय्य करणे अथवा सल्ला देणे या प्रयोजनार्थ शासन, स्थानिक प्राधिकरण अथवा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या कुणाही अधिका-याला विशेष अथवा कायम निमंत्रित म्हणून समिती निमंत्रित करु शकेल. अशा पध्दतीने निमंत्रित केलेल्या अधिका-याला कामकाजात भाग घेता येईल. परंतु त्याला मताधिकार असणार नाही.'

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, उपरोल्लेखित समिती यापूर्वीच प्राप्त व नोंदणी झालेल्या अर्जांवरही कार्यवाही करील."

बाब क्र.१० : मुंबई महानगर प्रदेशासाठी दूरसंचरण नियोजन शाखा-- दिनांक ३१ डिसेंबर, १९८५ पर्यंत कार्यरत ठेवण्याबाबत

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श करुन त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२९४ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिपत्त्याखालील परिवहन व दळणवळण विभागांतर्गत दूरसंचरण शाखा दिनांक ३१ डिसेंबर, १९८५ पर्यंत कार्यरत ठेवण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे दूरसंचरण सल्लागार व वरिष्ठ दूरसंचरण नियोजक ही पदे अनुक्रमे ३१ ऑगस्ट, १९८५ व ३१ डिसेंबर, १९८५ पर्यंत चालू ठेवण्यास प्राधिकरण याद्वारे आपली कार्योत्तर मंजूरी देत आहे."

बाब क्र.११ : मुंबई नगर विकास प्रकल्पाचा ३१ मार्च १९८५ पर्यंतच्या कार्यावर अधारीत प्रगती अहवाल

प्राधिकरणाने प्रगती अहवालाची नोंद घेतली. सर्व संबंधित अभीकरणानी

प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती देणे आवश्यक आहे असे मत त्या बाबतीत व्यक्त करण्यात आले.

बाब क्र.१२ : [अ] मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे १९८४-८५ सालाचे वार्षिक लेखे

[ब] मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १९८४-८५ सालाचा वार्षिक अहवाल

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श करून त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२९५ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण १९८४-८५ सालाचे वार्षिक लेखे व त्यावरील वित्त सल्लागारांचा अहवाल यांना याद्वारे मान्यता देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सन १९८४-८५ सालाच्या वार्षिक अहवालाच्या प्रारूपाला हे प्राधिकरण मान्यता देत आहे व हा अहवाल राज्य शासनास सादर करण्यासाठी प्राधिकरण महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र.१३ : महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ खाली कल्याणच्या विकास योजनेत किरकोळ फेरफार

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२९६ :

"ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४०[१][क] खाली दिनांक १५ मार्च १९७६ च्या शासन निर्णय क्र.टीपीबी/१२७५/११९१/नवि-८ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची कल्याण समूह अधिसूचित क्षेत्रासाठीचे एक विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती झाली आहे; आणि ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११३ [८] च्या तरतुदीखाली नियोजन प्राधिकरणाची कार्ये पार पाडण्याची जबाबदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणावर बंधनकारक आहे;

....८/-

"आणि ज्याअर्थी, भूतपूर्व कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ नगरपरिषदेचे क्षेत्र आणि उल्हासनगरचे पालिका क्षेत्र विशेष नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारितेत समाविष्ट करण्यात आले आहे.

"आणि ज्याअर्थी, कल्याण महानगरपालिकेने जागा क्र.४२ च्या आरक्षणात "क्रीडांगण"ऐवजी "शाळा व क्रीडांगण" असा आणि जागा क्र.४२ च्या संपादन व विकसन यांच्या प्राधिकारात 'कल्याण नगर परिषद' ऐवजी 'शारदा मंदिर संस्था' असा फेरफार करण्याचा निर्णय घेतला आहे;

"आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने कल्याणच्या अनुज्ञाप्राप्त विकास योजनेमध्ये, जागा क्र.५८ आणि ७८ च्या बाबतीत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ खाली फेरफार करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला निदेशित केले आहे ;

"आता म्हणून हे प्राधिकरण त्याला महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११३[८] मध्ये प्रयोज्य असलेल्या शक्तींचा वापर करून कल्याणच्या अनुज्ञाप्राप्त विकास योजनेत जागा क्र.४२ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ३७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे, किरकोळ फेरफार करण्याचा निर्णय याद्वारे घेत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण उक्त अधिनियमाच्या कलम ३७ खालील प्रयोज्य शक्तींचा व त्या संदर्भात त्याला सक्षम बनविणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून अशा फेरफारास अनुलक्षून जनतेकडून हरकती व शिफारशी मागविण्याकरिता महाराष्ट्र शासन राजपत्र आणि दोनहून कमी नाही इतक्या स्थानिक वृत्तपत्रांतून एक नोटीस प्रकाशित करण्यास आणि अशी नोटीस प्रकाशित झाल्यापासून एका महिन्यानंतर नाही इतक्या अवधीत त्या स्वीकारण्यास याद्वारे आपली मान्यता देत आहे;

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण उक्त अधिनियमाचे कलम १३९ खालील प्रयोज्य शक्ती, सोबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, अधिनियम १९७४ चे कलम ७[अ] वाचावे, यांचा वापर करून पूर्वगामी खंडांशी सुसंगत अशा प्रकारे ती नोटीस प्रकाशित करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे;

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम १५१ [३] खालील प्रयोज्य शक्तींचा वापर करून हे प्राधिकरण असा निदेश देत आहे की, महानगर आयुक्तानी त्या संदर्भात हरकती/सूचना सादर करणाऱ्या

...९/-

व्यक्तींची बाजू ऐकून त्या हरकती/सूचना विचारात घ्याव्यात आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७ मधील तरतूदीना धरून त्यानी आपले प्रतिवेदन प्रस्तावित फेरफारांसह अंतिम मंजूरीसाठी शासनाला सादर करावे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, जागा क्र.५८ आणि ७८ बाबतीत कोणताही फेरफार केला जाऊ नये व तसे शासनाला कळविण्यात यावे."

बाब क्र.१४ : महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ खाली डोंबिवलीच्या विकास योजनेत किरकोळ फेरफार

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२९७ :

"ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०[१] [क] खाली दिनांक १५ मार्च, १९७६ च्या शासन निर्णय क्र.टीपीबी/१२७५/११९१/नवि-८ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची कल्याण समूह अधिसूचित क्षेत्रासाठीचे एक विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती झाली आहे आणि ज्याद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११३[८] च्या तरतुदीखाली नियोजन प्राधिकरणाची कार्ये पार पाडण्याची जबाबदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणावर बंधनकारक आहे;

"आणि ज्याअर्थी भूतपूर्व कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ नगरपरिषदेचे क्षेत्र आणि उल्हासनगरचे पालिका क्षेत्र विशेष नियोजन प्राधिकरणाच्या अधिकार कक्षेत येते;

"आणि ज्याअर्थी राज्य शासनाने कल्याण महानगरपालिकेला पाठविलेल्या आपल्या पत्रात [क्र.टीपीएस/१२८२/४६९४/नवि-५ दिनांक १४ जून, १९८४] डोंबिवली विकास योजनेतील स्थान क्र.५८ व ७४ च्या आरक्षणाबाबतीत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ च्या तरतुदीखाली फेरफार करण्याचे कल्याण महानगरपालिकेला निर्देशित केले आहे.

"आणि ज्याअर्थी 'हिंदी प्रसारक मंडळ' आणि 'विद्या विकास मंडळ, रामनगर' यांच्या नावे आणि प्राथमिक शाळेच्या प्रयोजनासाठी आरक्षित असलेली अनुक्रमे क्र.५८ आणि क्र.७४ ची स्थाने [साईटस] ज्ञानेश्वर मठ ट्रस्टच्या

नावे निर्देशित करता यावीत म्हणून डोंबिवलीच्या अनुज्ञेय विकास योजनेत किरकोळ फेरफार घडवून आणण्याच्या दृष्टीने कल्याण महानगरपालिकेने दिनांक १२ डिसेंबर, १९८४ रोजी क्र•२०१ चा ठराव मंजूर केला;

"आता म्हणून, हे प्राधिकरण [मुं•म•प्र•वि•प्राधिकरण] त्याला महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११३[८] मध्ये प्रयोज्य असलेल्या शक्तीचा वापर करून डोंबिवलीच्या अनुज्ञाप्राप्त विकास योजनेत, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे, स्थान क्र•५८ व ७४ च्या बाबतीत किरकोळ फेरफार घडविण्याचा याद्वारे निर्णय घेत आहे;

"त्यापुढे असाहे ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण उक्त अधिनियमाच्या कलम ३७ खालील प्रयोज्य शक्तींचा व त्या संदर्भात त्याला सक्षम बनविणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून अशा फेरफारास अनुलक्षून जनतेकडून हरकती व शिफारशी मागविण्याकरिता महाराष्ट्र शासन राजपत्रात आणि दोनहून कमी नाही इतक्या स्थानिक वृत्तपत्रांतून एक नोटीस प्रकाशित करण्यास आणि अशी नोटीस प्रकाशित झाल्यापासून एका महिन्यानंतर नाही इतक्या अवधीत त्या स्वीकारण्यास याद्वारे आपली मान्यता देत आहे•

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण उक्त अधिनियमाच्या कलम १३९ खालील प्रयोज्य शक्ती; सोबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, अधिनियम १९७४ चे कलम ७[अ] वाचावे; यांचा वापर करून पूर्वगामी खंडाशी सुसंगत अशा प्रकारे ती नोटीस प्रकाशित करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे•

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम १५१[३] खालील प्रयोज्य शक्तींचा वापर करून हे प्राधिकरण असा निदेश देत आहे की, महानगर आयुक्तांनी त्या संदर्भात हरकती/सूचना सादर करणाऱ्या व्यक्तींची बाजू ऐकून घेऊन त्या हरकती/सूचना विचारात घ्याव्यात आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७ मधील तरतूदींना धरून त्यांनी आपले प्रतिवेदन प्रस्तावित फेरफारांसह अंतिम मंजूरीसाठी शासनाला सादर करावे•"

बाब क्र•१५ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना दुसरी अंतरिम वाढ देणे

प्राधिकरणाने बाबटिप्पणीवर विचारविमर्श केला व त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

•••११/-

43१

ठराव क्र.२९८ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महाराष्ट्र शासनाने दिनांक १४ ऑगस्ट, १९८५ च्या शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेसुधा-१०८५/९६२/सेवा-७ अन्वये आपल्या कर्मचा-यांना दिनांक १ मार्च १९८५ पासून मंजूर केलेल्या दुस-या अंतरिम वाढीच्या धर्तीवर व वाव टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे, हे प्राधिकरण मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सेवेतील कर्मचा-यांना दुसरी अंतरिम वाढ याद्वारे मंजूर करीत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, दुसरी अंतरिम वाढ कर्मचारी वर्गास देण्याच्या अनुलक्षाने यापूर्वीच करण्यात आलेल्या कार्यवाहीस हे प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे."

बाब क्र.१६ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कर्मचा-यानी स्थापन केलेल्या क्रीडा व सांस्कृतिक मंडळाला रु.५०००/- चे अनुदान सहाय्य

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला व त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२९९ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कर्मचा-यानी स्थापन केलेल्या क्रीडा व सांस्कृतिक मंडळाला प्रतिसाल रु.५०००/- चे अनुदान सहाय्य या बाब टिप्पणीच्या परिच्छेद २ मध्ये उल्लेखित अटींच्या अधीन राहून देण्यास प्राधिकरण आपली याद्वारे मान्यता देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, प्राधिकरणाची मान्यता गृहीत धरून मंडळाला या अगोदरच रु.२०००/- इतकी रक्कम अदा करण्याच्या महानगर आयुक्तांच्या कृती चे हे प्राधिकरण याद्वारे अनुसमर्थन करीत आहे."

बाब क्र.१७ : जलमार्ग खोदाई प्रभार भरण्यापासून सूट मिळावी म्हणून वांद्रे येथील वेहराम सुधार समितीकडून आलेला विनंती अर्ज

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श करून त्या संदर्भात कार्यकारी समितीने घेतलेल्या निर्णयाचे अनुसमर्थन केले.

अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

# MINUTES OF THE THIRTY-NINTH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

**DATE** : 2nd January, 1986 (Thursday)

**TIME** : 2.00 P.M.

**PLACE** : The Honourable Chief Minister's Committee Room (6th Floor), Mantralaya, Bombay.

**MEMBERS PRESENT :**

| | |
|---|---|
| Shri Shivajirao Patil-Nilangekar, Chief Minister and Minister for Urban Development. | - Chairman |
| Dr. V. Subramanian, Minister for Housing. | - Member |
| Dr. Rammanohar V. Tripathi, Minister of State for Urban Development. | - Member |
| Shri Chhagan C. Bhujbal, Mayor of Bombay. | - Member |
| Shri Amarnath Waman Patil, Chairman, Standing Committee, B.M.C. | - Member |
| Shri R.C. Ankleswaria, Councillor, B.M.C. | - Member |
| Smt. Indumati T. Patel, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Bhagwantrao A. Patil, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Ramesh Dube, M.L.A. | - Member |
| Shri Chandrashekhar Prabhu, M.L.A. | - Member |
| Shri Pandurang S. Deshmukh, M.L.C. | - Member |
| Shri B.G. Deshmukh, Chief Secretary to Government of Maharashtra. | - Member |
| Shri D.K. Jain, Secretary to Government, Urban Development Department. | - Member |
| Shri D.K. Afzulpurkar, Secretary to Government, Housing and Special Assistance Department. | - Member |
| Shri S.R. Kakodkar, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary. |

Item No.1 : .....

<u>Item No. 1</u> : Confirmation of the minutes <u>of the last (37th) Meeting.</u>

The Chairman observed that the 37th meeting of the Authority, minutes of which were on the agenda for confirmation, was held on 8th April, 1985 for the specific purpose of ratifying the decisions taken by the Authority by circulation in its 36th meeting. However, in the 37th meeting, the decisions taken by circulation on 6 items in the 36th meeting bearing Resolutions Nos.276, 277, 282, 284, 285 and 286 were substantively modified. Chairman clarified that the correct legal position on this matter is that a decision taken by circulation cannot be substatively modified in the meeting called to ratify that decision.

It was explained that modifications made in Resolutions Nos.276 and 277 were not given effect to while promulgating the Notification under Section 13 of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974.

In respect of Resolution No.282, it was stated that even though additional posts were sanctioned by the Authority for the Engineering Division, none of the posts sanctioned had been filled so far and that only minimum essential number of posts would be filled during the remaining period of 1985-86.

In respect of Resolution No.284, it was pointed out that Government is not agreeable to merge the posts of Financial Adviser and the Chief Accounts Officer. Government's view was that the two posts should remain separate and for the post of Chief Accounts Officer the old scale of pay of Rs.1500-2250 be revived. The Authority agreed with the Government view.

In respect of Resolution No.285 pertaining to Area Development Scheme, Pawai, it was stated that by modifying the decision already taken, some additional conditions were incorporated. However, the draft of the tripartite agreement is still under consideration of the Law and Judiciary Department of the Government.

In respect .....

In respect of Resolution No.286, it was stated that by the modifications made therein, alternate sanction was accorded for allotting the plots under reference to Life Insurance Corporation of India at the rate of Rs.3,200/- per FSI sq. metre in case the Commissioner of Labour did not accept the offer made to him.

The minutes were then confirmed.

Item No. 2 : Action taken on the minutes of the last (37th) Meeting.

Action taken report was noted by the Authority.

Item No. 3 : Sitting fees to non-official members for attending the meeting of the Authority.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.290 :

"Resolved that in exercise of the powers conferred by sub-section (5) of Section 4 read with Section 50 of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the BMRDA hereby makes the Bombay Metropolitan Region Development Authority (Allowance to Members)(Amendment) Regulations, 1985, as proposed in Annexure-II to the Item Note, subject to approval of the State Government thereto.

"Resolved further that the Metropolitan Commissioner be authorised to move the State Government in the matter."

Item No. 4 : Allotment of commercial plots Nos.C-18 and C-19 in 'E' Block of the Bandra-Kurla Complex to the Life Insurance Corporation of India - Revision in Premium.

After discussion on this item the revision of premium from Rs.3,200/- per FSI sq. metre to Rs.4,550/- per FSI sq. metre was approved by the Authority. It was also suggested that an additional condition should be stipulated viz., one-tenth of the built-up area of the plots should be allotted by the lessee to the State Government on rental basis, at a rent to be decided by the State Public Works Department. The following

Resolution .....

Resolution was passed :

RESOLUTION NO.291 :

"Resolved that in exercise of the powers vested in it, the Authority hereby accords its **approval** for revision of premium from Rs.3,200/- per FSI sq. metre to Rs.4,550/- per FSI sq. metre in respect of allotment of two commercial plots Nos.C-18 and C-19 in 'E' Block of the Bandra-Kurla Complex to the Life Insurance Corporation of India, subject to the additional condition that one-tenth of the built-up area on the plots will be allotted by the lessee to the State Government at the rent to be determined by the State Public Works Department."

Item No. 5 : Disposal of plot in 'H' Block of the Bandra-Kurla Complex to Oil and Natural Gas Commission.

Consideration of this item was deferred.

Item No. 6 : Allotment of land at Panchpakhadi, Tahsil Thane - Request of the BMRDA Employees' Co-operative Housing Society (Proposed).

During the course of discussion on this item, it was observed that the valuation of the land under reference as made by the Director of Town Planning at Rs.250/- per sq. metre as on 1st February, 1984 appeared to be on the lower side. It was, therefore, decided that revaluation of land be got done from the Director of Town Planning.

Item No. 7 : Levy of Cess under Section 25 of the BMRDA Act, 1974.

After some discussion, consideration of this item was deferred.

Item No. 8 : Appointment of Planning Committee for hearing objections/suggestions on Planning Proposals for Oshiwara District Centre.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.292 :

"Resolved that in exercise of its powers under Sub-Section 2 of Section 29 of the MRTP Act, 1966 and all other powers enabling it in this behalf, the

Metropolitan .....

Metropolitan Authority do approve to forward all objections and suggestions received to the Draft Proposals of the Oshiware District Centre to the Planning Committee consisting of following members of the Metropolitan Authority that is to say -

(1) Smt. Indumati T. Patel;
(2) The Municipal Commissioner, B.M.C.; and
(3) The Metropolitan Commissioner;

with its direction to deal with them in accordance with law for the time being in force."

Item No. 9 : Disposal of built-up space in the Truck Terminal at Wadala.

After discussion, the Authority passed the following Resolution :

RESOLUTION NO.293 :

"Resolved that in exercise of the powers conferred by sub-section (1) of Section 9 read with Section 50 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the BMRDA hereby makes the Bombay Metropolitan Region Development Authority Truck Terminal Immovable Property Committee (Constitution, Powers and Functions) Regulations, 1986 as proposed at Annexure 'A' to the Item Note, subject to the following modifications being made therein :-

(1) That the draft Regulation No.4 be so modified as to have the Committee consisting of the Metropolitan Commissioner, BMRDA as Chairman; and the Municipal Commissioner, Municipal Corporation of Greater Bombay, and the Transport Commissioner, Bombay as Members.

(2) That the draft Regulation No.7 be modified so that two Members of the Committee shall constitute a quorum.

(3) That a new Regulation viz. No.12 be added to the proposed Regulations as follows :

'12. The Committee may invite any Officer of Government or Local Authority or of BMRDA to attend its meeting or meetings as a special or permanent invitee for the purpose of assisting or advising it on any matter or matters. The Officers so invited may take part in the proceedings, but shall have no right to vote.'

"Resolved.....

"Resolved further that the Committee mentioned above shall also take action on the applications which have already been received and registered."

Item No.10 : Cell for Telecommunication Planning for the Bombay Metropolitan Region - Continuance upto 31st December, 1985.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.294 :

"Resolved that the Authority hereby approves the continuance of Telecommunication Cell under Transport and Communications Division, BMRDA upto 31st December, 1985, as proposed.

"Resolved further that the Authority hereby accords its post-facto sanction to the continuance of the posts of Telecommunication Adviser and the Senior Telecommunication Planner upto 31st August, 1985 and 31st December, 1985, respectively, as proposed."

Item No.11 : Progress Report of Bombay Urban Development Project (BUDP) till 31st March, 1985.

The Progress Report was noted by the Authority. It was observed that it is necessary to implement the Project expeditiously by all the implementing agencies.

Item No.12 : (a) Annual Accounts of BMRDA for the year 1984-85.
(b) Annual Report of the BMRDA for the year 1984-85.

RESOLUTION NO.295 :

"Resolved that the Bombay Metropolitan Region Development Authority hereby accords its approval to the accounts of the Authority for the year 1984-85 and the Report of the Financial Adviser thereon.

"Resolved further that the Authority hereby approves the draft of the Annual Report of the Bombay Metropolitan Region Development Authority for 1984-85 and authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No.13 : Minor Modifications to Development Plan of Kalyan under MRTP Act, 1966.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.296 :

"Whereas BMRDA is appointed as Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area as per Government Resolution No.TPB/1275/1191/UD-8, dated 15th March, 1976, under the provisions of Section 40(1)(c) of MR&TP Act, 1966 and whereas it is obligatory on BMRDA to perform the functions of Planning Authority under the provisions of Section 113(8) of MR&TP Act, 1966;

"And whereas the area of erstwhile Municipal Councils for Kalyan, Dombivili, Ambernath and municipal limits of Ulhasnagar are included within the jurisdiction of Special Planning Authority;

"And whereas the Kalyan Municipal Corporation has resolved to modify the reservation of Site No.42 from "playground" to "School and playground" and the appropriate Authority for the acquisition and development of Site No.42 from "Municipal Council of Kalyan" to "Sharda Mandir Sanstha, Kalyan";

"And whereas the Government of Maharashtra has directed BMRDA to initiate modifications to the sanctioned Development Plan for Kalyan in respect of reservation in Sites Nos.58 and 78 under the provisions of Section 37 of MR&TP Act, 1966;

"Now, therefore, in exercise of the powers contained in Section 113(8) of MR&TP Act, 1966, BMRDA resolves to initiate minor modification to the sanctioned Development Plan of Kalyan as indicated in Section 37 of MR&TP Act in respect of Site No.42.

"Resolved further that the Authority do in exercise of powers under Section 37 of the said Act and other powers enabling it in this behalf, approve of a notice being published in the Maharashtra Government Gazette and in not less than two local newspapers inviting objections and suggestions from the public with respect to such modification not later than one month from the date of such notice.

"Resolved.....

"Resolved further that the Authority do in exercise of its powers under Section 139 of the said Act, read with Section 7(A) of the BMRDA Act, 1974 authorise the Metropolitan Commissioner to publish the notice in accordance with the foregoing clauses.

"Resolved further that the Authority do in exercise of its powers under Section 151(3) of the said Act direct that the Metropolitan Commissioner shall consider the objections/suggestions which may be received in this behalf, after giving hearing to persons presenting such objections/suggestions and shall submit his report to the State Government along with proposed modifications for final sanction in terms of Section 37 of the said Act.

"Resolved further that no modifications be made in respect of Sites Nos.58 and 78 and Government be informed accordingly."

Item No.14 : Minor Modification to Development Plan of Dombivili under MRTP Act, 1966.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.297 :

"Whereas BMRDA is appointed as Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area as per Government Resolution No.TPB/1275/1191/UD-8, dated 15th March, 1976 under the provisions of Section 40(1)(c) of MR&TP Act, 1966 and whereas it is obligatory on BMRDA to perform the functions of Planning Authority under the provisions of Section 113(8) of MR&TP Act, 1966;

"And whereas the area of erstwhile Municipal Councils for Kalyan, Dombivali, Ambernath and Municipal limits of Ulhasnagar are included within the jurisdiction of Special Planning Authority;

"And whereas the Development Plan of Dombivali has been sanctioned by Government under Government Notification No.TPS/1276/1019/UD-5, dated 10.12.1976;

"And whereas the Government of Maharashtra has under No.TPS/1282/4694/UD-5, dated 14.6.1984 directed the Kalyan Municipal Corporation to initiate

modifications.....

modifications to the sanctioned Development Plan for Dombivali in respect of reservation in Sites Nos.58 and 74 under the provisions of Section 37 of MR&TP Act, 1966;

"And whereas the Kalyan Municipal Corporation has resolved under Resolution No.201, dated 12.12.1984 to effect the minor modification, under Section 37 of MR&TP Act, 1966, to the sanctioned Development Plan of Dombivali so as to designate the Sites Nos.58 and 74 reserved for primary schools in the name of "Dynaneshwar Math Trust" as against the names of "Hindi Prasarak Mandal" and "Vidya Vikas Mandal, Ramnagar", respectively.

"Now, therefore, in exercise of the powers contained in Section 113(8) of MR&TP Act, 1966, the Bombay Metropolitan Region Development Authority resolves to initiate minor modification to the sanctioned Development Plan of Dombivali as indicated in Section 37 of MR&TP Act in respect of Sites Nos.58 and 74.

"Resolved further that the Authority do in exercise of powers under Section 37 of the said Act and other powers enabling it in this behalf, approve of a notice being published in the Maharashtra Government Gazette and in not less than two local newspapers inviting objections and suggestions from the public with respect to such modification not later than one month from the date of such notice.

"Resolved further that the Authority do in exercise of its powers under Section 139 of the said Act, read with Section 7(A) of the BMRDA Act, 1974 authorise the Metropolitan Commissioner to publish the notice in accordance with the foregoing clauses.

"Resolved further that the Authority do in exercise of its powers under Section 151(3) of the said Act direct that the Metropolitan Commissioner shall consider the objections/suggestions which may be received in this behalf, after giving hearing to persons presenting such objections/suggestions and shall submit his report to the State Government along with proposed modifications for final sanction in terms of Section 37 of the said Act."

<u>Item No.15</u> : ......

Item No.15 : Grant of Interim Relief-2 to the BMRDA Employees.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.298 :

"Resolved that the Authority hereby approves the grant of Interim Relief-2 to the BMRDA Employees with effect from 1st March, 1985 on the lines of Interim Relief-2 granted to Government employees vide Government Resolution, Finance Department No. वेसुधा-१०८५/९६२/सेवा-७, dated 14th August, 1985, as proposed.

"Resolved further that the Authority approves the action already taken to release the second instalment of Interim Relief."

Item No.16 : Grant-in-aid-of Rs.5,000/- to the BMRDA Employees Sports & Cultural Association.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.299 :

"Resolved that the Authority hereby sanctions annual grant-in-aid of Rs.5,000/- to the BMRDA Sports & Cultural Association on the conditions mentioned in para.3 of the Item Note, as proposed.

"Resolved further that the action taken by the Metropolitan Commissioner to release Rs.2,000/- to the Association in anticipation of Authority's sanction is hereby ratified."

Item No.17 : Request for exemption from payment of channelisation charges - application by Behram Sudhar Committee of Bandra.

The Authority considered the Item Note and endorsed the decision taken by the Executive Committee.

The meeting then concluded with a vote of thanks to the Chair.

ßßßßßßßßßßßßßßßß

ukd:20286: